# महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय

**Mahatma Gandhi Antarrashtriya Hindi Vishwavidyalaya**

(संसद द्वारा पारित अधिनियम 1997, क्रमांक 3 के अंतर्गत स्थापित केन्द्रीय विश्वविद्यालय)

*(A Central University Established by Parliament by Act No. 3 of 1997)*

ज्ञान शांति मैत्री

**डॉ. सुरेन्द्र पी. गादेवार**
**Dr. Surendra P. Gadewar**
कार्यकारी कुलसचिव
Acting Registrar

दूरभाष / Phone : +91-7152-230902


क्रमांक : 34/2022-23/MJP/11-03/ 529
दिनांक : 23 .10.2026

## सूचना

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, वर्धा द्वारा संचालित पिपरी (मेघे) एवं 13 गाँव प्रादेशिक जलापूर्ति योजना के अंतर्गत जलापूर्ति पाइपलाइन को जोड़ने संबंधी अत्यावश्यक तकनीकी कार्य किए जाने के कारण **दिनांक 24 अक्टूबर, 2026 से लगातार 4 से 5 दिनों तक जलापूर्ति बाधित रहने की सूचना प्राप्त हुई है।** इसके अतिरिक्त, धाम नदी का जलपात्र सूखने के कारण वर्धा शहर की जलापूर्ति व्यवस्था भी प्रभावित हुई है। अतः विश्वविद्यालय परिसर में उक्त अवधि में जलापूर्ति बाधित रहेगी तथा नियमित जलापूर्ति बहाल होने में विलंब होने की भी संभावना है। महाराष्ट्र जीवन प्राधिकरण से विश्वविद्यालय को जलापूर्ति के अनुसार परिसर में जलापूर्ति की जाएगी।

साथ ही, आगामी जल संकट को ध्यान में रखते हुए जिला प्रशासन, वर्धा द्वारा वर्धा जिले के शहरी एवं ग्रामीण क्षेत्रों में नए बोरवेल एवं कुओं की खुदाई तथा पूर्व से निर्मित बोरवेल एवं कुओं को अधिक गहरा करने के कार्यों पर **आगामी आदेश तक अस्थायी रूप से रोक लगा दी गई है।**

उपर्युक्त के आलोक में विश्वविद्यालय परिसर में जल की उपलब्धता सुनिश्चित करने तथा वर्तमान एवं आगामी जलसंकट की स्थिति को ध्यान में रखते हुए जल की उपलब्धता बनाए रखने हेतु विश्वविद्यालय के समस्त शिक्षकों, अधिकारियों, कर्मचारियों, विद्यार्थियों एवं निवासियों को अनुरोध है कि वे अगले आदेश तक निम्नांकित निर्देशों का गंभीरतापूर्वक पालन करें तथा जल के अपव्यय को रोकने में सक्रिय सहयोग प्रदान करें:-

1. उपलब्ध जल का उपयोग केवल आवश्यक कार्यों के लिए ही करें।
2. वाहनों को धोने के लिए पेयजल अथवा नल के पानी का उपयोग न करें।
3. पौधों एवं बगीचों में सिंचाई के लिए उपयुक्त अपशिष्ट जल (Wastewater) का उपयोग करें।
4. नल को अनावश्यक रूप से खुला न छोड़ें।
5. स्नान करने, बर्तन धोने, कपड़े धोने एवं अन्य घरेलू कार्यों में पानी का सीमित उपयोग करें तथा अनावश्यक रूप से अधिक पानी बहाने से बचें।
6. फर्श, बरामदे, सीढ़ी, वाहन पार्किंग एवं अन्य खुले स्थानों की सफाई के लिए पानी का अपव्यय न करें।
7. नलों, फ्लश टैंकों एवं जलापूर्ति पाइपलाइनों में किसी प्रकार का रिसाव दिखाई देने पर तत्काल संबंधित अनुरक्षण कर्मचारी/अनुभाग को सूचित करें, ताकि पानी की बर्बादी रोकी जा सके।
8. वर्तमान एवं आगामी जलसंकट को ध्यान में रखते हुए आवश्यकतानुसार जल का सुरक्षित भंडारण करें।
9. विश्वविद्यालय परिसर में स्थित कार्यालयों, छात्रावासों, आवासीय परिसरों एवं अन्य भवनों में जल संरक्षण के प्रति जागरूक रहें।
10. वर्तमान एवं आगामी जलसंकट को ध्यान में रखते हुए जिन आवासों एवं छात्रावासों में बाहर सीधे जलापूर्ति पाइपलाइन के माध्यम से नल कनेक्शन उपलब्ध हैं, उन सभी आवासों एवं छात्रावासों के नल कनेक्शनों को बंद किया जाएगा।

इसे सक्षम प्राधिकारी के अनुमोदनोपरांत निर्गत किया जाता है।

**(डॉ. सुरेंद्र पी. गादेवार)**
23/10/2026

**प्रतिलिपि :**

1. कुलपति सचिवालय
2. कुलसचिव कार्यालय
3. वित्ताधिकारी कार्यालय
4. परीक्षा नियंत्रक कार्यालय
5. अधिष्ठाता, छात्र कल्याण एवं अध्यक्ष-मेस प्रबंधन समिति
6. कुलानुशासक
7. मुख्य छात्रावास अधीक्षक
8. समस्त छात्रावास अधीक्षक एवं प्रभारी नागार्जुन अतिथि गृह
9. समस्त शिक्षक, अधिकारी, कर्मचारी
10. अन्य समस्त अकादमिक एवं प्रशासनिक अनुभाग/कार्यालय
11. सुरक्षा अधिकारी
12. प्रभारी, लीला (विश्वविद्यालय की वेबसाइट पर अपलोड करने हेतु)
13. समस्त सेवा प्रदाता एजेंसी
14. गौशाला
15. गांधी हिल कैंटीन संचालक
16. संबंधित फाइल


पोस्ट मानस मंदिर, गांधी हिल्स, वर्धा - 442 001 (महाराष्ट्र), भारत
Post Manas Mandir, Gandhi Hills, Wardha-442 001 (Maharashtra), INDIA
**वेबसाइट/Website :** www.hindivishwa.org, **ई-मेल/E-mail :** registrar@mgahv.in

महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

## जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, वर्धा

महात्मा गांधी पुतळयाजवळ, सिव्हिल लाईन, वर्धा 442001.

नियंत्रण कक्ष संपर्क क्रमांक - 07152-243446/299010

**ई-मेल- wardhardc@gmail.com / ddmawardha@gmail.com**

क्र./जि.आ.व्य/म.स/कावि/दुष्काळ/2026 2513 दिनांक 13 ऑक्टोबर 2026.

**आदेश**

**विषय : वर्धा जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रात नवीन बोअरवेल खोदकाम, नवीन विहिरींचे खोदकाम तसेच अस्तित्वात असलेल्या बोअरवेल व विहिरींचे अधिक खोलीकरण करण्याच्या कामांवर पुढील आदेशापर्यंत तात्पुरती बंदी घालण्याबाबत.**

**संदर्भ :**1. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, 2009 (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक XXVI of 2013).

2.आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 मधील कलम 30 व 34.

3. वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचा अहवाल दिनांक 01.10.2026.

--oo--

ज्याअर्थी, वर्धा जिल्ह्यातील भूजलसाठ्याचे संवर्धन करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवरील अतिरिक्त ताण कमी करणे आणि आगामी कालावधीत संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अनियंत्रितपणे नवीन बोअरवेल व विहिरींचे खोदकाम तसेच अस्तित्वातील बोअरवेल व विहिरींचे अधिक खोलीकरण केल्यामुळे भूजलसाठ्यावर अतिरिक्त ताण निर्माण होण्याची शक्यता आहे. शासकीय यंत्रणांमार्फत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या कामांना अपवाद ठेवून अन्य नवीन खोदकामांवर तात्पुरते निर्बंध लागू करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 मधील कलम 30 व 34 अंतर्गत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या लागू अधिकारांचा विचार करून तसेच महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, 2009 मधील संबंधित तरतुदींच्या अधीन राहून प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी वान्मथी सी. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, वर्धा याद्वारे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**बोअरवेल व विहिरींच्या खोदकामावर तात्पुरती बंदी**

1. सदर आदेशाच्या दिनांकापासून वर्धा जिल्ह्यातील संपूर्ण शहरी व ग्रामीण क्षेत्रात पुढील आदेशापर्यंत नवीन बोअरवेल खोदण्यास तात्पुरती बंदी राहील.
2. नवीन खुल्या विहिरींचे खोदकाम करणे, नवीन बोअरवेल/कूपनलिका खोदणे तसेच अस्तित्वात असलेल्या बोअरवेल किंवा विहिरींचे अधिक खोलीकरण करण्याची कामे या आदेशान्वये प्रतिबंधित राहतील.
3. वरील बंदी खासगी व्यक्ती, शेतमालक, गृहनिर्माण संस्था, बांधकाम व्यावसायिक, उद्योग, व्यावसायिक आस्थापना, संस्था तसेच बोअरवेल खोदकाम करणारे कंत्राटदार, रिगमालक व यंत्रचालक यांना लागू राहील.
4. केवळ अस्तित्वात असलेल्या विहिरीचा किंवा बोअरवेलचा नियमित वापर करण्यावर या आदेशाद्वारे स्वतंत्रपणे बंदी घालण्यात येत नाही. तथापि, भूजल कायद्यानुसार लागू असलेले निर्बंध, परवानगीच्या अटी व पाणीउपशासंबंधी आदेश यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

(58)

**शासकीय पाणीटंचाई निवारणाच्या कामांना अपवाद**

1. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नगरपरिषद, नगरपंचायत किंवा अन्य सक्षम शासकीय यंत्रणेमार्फत करण्यात येणाऱ्या आवश्यक कामांना या आदेशातून अपवाद देता येईल.
2. असा अपवाद केवळ संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वलिखित प्रशासकीय मंजुरी, आवश्यक तांत्रिक शिफारस व लागू भूजलविषयक परवानग्या प्राप्त झाल्यानंतरच लागू राहील.
3. अपवाद मंजूर करताना संबंधित क्षेत्रातील भूजल उपलब्धता, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवरील परिणाम, पर्यायी जलस्रोतांची उपलब्धता आणि कामाची अत्यावश्यकता विचारात घ्यावी.
4. शासकीय यंत्रणेमार्फत काम होत असल्याच्या कारणावरून कोणत्याही कामास आपोआप सूट मिळणार नाही. संबंधित कामाचा शासकीय कार्यादेश, सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी आणि आवश्यक परवानग्या उपलब्ध असणे बंधनकारक राहील.
5. सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांच्या संरक्षणासाठी किंवा तातडीच्या पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक असलेली कामे प्राधान्याने विचारात घेण्यात यावीत.

**यापूर्वी सुरू असलेल्या प्रतिबंधित कामांबाबत**

1. या आदेशाच्या कक्षेत येणारी आणि कोणत्याही लागू वैधानिक परवानगी किंवा शासकीय अपवादाशिवाय सुरू असलेली नवीन बोअरवेल/विहीर खोदकामाची तसेच अधिक खोलीकरणाची कामे तात्काळ थांबविण्यात यावीत.
2. संबंधित मालक, कंत्राटदार व यंत्रचालक यांनी खोदकामाची यंत्रसामग्री सुरक्षित स्थितीत ठेवावी. उघडी विहीर किंवा बोअरवेलमुळे नागरिक, पशुधन अथवा सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होणार नाही, यासाठी आवश्यक प्रतिबंधक व्यवस्था करावी.
3. वैध शासकीय कार्यादेशांतर्गत सुरू असलेल्या आणि कलम २ नुसार अपवादास पात्र असलेल्या कामांबाबत संबंधित विभागाने सक्षम प्राधिकाऱ्याकडून आवश्यक लेखी स्पष्टता प्राप्त करावी.

**कंत्राटदार, रिगमालक व यंत्रचालकांना निर्देश**

1. कोणत्याही प्रतिबंधित ठिकाणी नवीन बोअरवेल किंवा विहीर खोदण्याचे काम स्वीकारू नये किंवा सुरू करू नये.
2. शासकीय अपवादाचा दावा करण्यात येत असल्यास संबंधित कामाचा कार्यादेश, मंजुरीपत्र व लागू परवानग्यांच्या प्रती कामाच्या ठिकाणी उपलब्ध ठेवाव्यात.
3. सक्षम अधिकाऱ्यांनी मागणी केल्यास संबंधित कागदपत्रे तपासणीसाठी सादर करावीत.

**अंमलबजावणीची जबाबदारी**

1. सर्व उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात आदेशाच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवावी.
2. सर्व तहसीलदार यांनी संबंधित पोलीस विभाग, ग्रामपंचायत, नगरपरिषद/नगरपंचायत आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या समन्वयाने प्रतिबंधित खोदकामाची तपासणी करावी.
3. जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नगरपरिषद प्रशासन व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आदेशाची माहिती देऊन अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
4. ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी व संबंधित क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी प्रतिबंधित खोदकाम आढळल्यास त्याची माहिती तात्काळ संबंधित तहसीलदारांना द्यावी.
5. पोलीस विभागाने सक्षम महसूल/प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक सहकार्य करावे.
6. उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी आदेशाच्या अंमलबजावणीचा प्रारंभिक अहवाल तीन दिवसांच्या आत आणि त्यानंतर आवश्यकतेनुसार साप्ताहिक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

५८७

**आदेशाचे उल्लंघन झाल्यास कार्यवाही**

1. प्रतिबंधित खोदकाम आढळल्यास संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी काम तात्काळ थांबविण्याची कार्यवाही करावी व घटनेचा पंचनामा/तपासणी अहवाल तयार करावा.
2. संबंधित मालक, कंत्राटदार, रिगमालक व यंत्रचालक यांची नावे, पत्ता, कामाचे ठिकाण, यंत्रसामग्रीचा तपशील, खोदकामाची स्थिती आणि उपलब्ध परवानग्यांची माहिती नोंदवावी.
3. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५, महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ आणि अन्य लागू कायद्यांतील संबंधित तरतुदींनुसार, संबंधित तरतुदींचे घटक पूर्ण होत असल्यास, सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.
4. लागू कायद्यांत स्पष्ट तरतूद नसताना स्वतंत्र दंड, यंत्रसामग्री जप्ती किंवा इतर दंडात्मक कारवाई या आदेशाद्वारे आपोआप लागू झालेली मानली जाणार नाही. अशी कार्यवाही संबंधित कायद्यातील अधिकार व विहित प्रक्रियेनुसारच करण्यात यावी.

हा आदेश वर्धा जिल्ह्यातील संपूर्ण शहरी व ग्रामीण क्षेत्रात लागू राहील आणि पुढील आदेशापर्यंत प्रभावी राहील. परिस्थितीचा आढावा, भूजल उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची गरज आणि संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांच्या शिफारशी विचारात घेऊन या आदेशात आवश्यकतेनुसार बदल, शिथिलता किंवा रद्द करण्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल. सदर आदेशामुळे विद्यमान विहिरी किंवा बोअरवेलच्या वापरास सर्वसाधारण बंदी लागू होत नाही. तथापि, अन्य लागू वैधानिक निर्बंध कायम राहतील.

Digitally signed by
Vanmathi Chenniappan
Date: 13-10-2026
16:29:20

(वानमथी सी.)भा.प्र.से

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हाआपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण वर्धा.**

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सादर.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा.
3. पोलीस अधीक्षक, वर्धा.
4. उपविभागीय अधिकारी, (सर्व) वर्धा जिल्हा.
5. तहसीलदार, (सर्व) वर्धा जिल्हा.
6. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, वर्धा.
7. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, वर्धा.
8. नगरपरिषद/नगरपंचायतींचे मुख्याधिकारी(सर्व).
9. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व) वर्धा जिल्हा.
10. जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा यांना प्रसिद्धीसाठी.